| स्टॅम्प ई-चलन | | |
|---|---|---|
| जी.आर.एन. नंबर | : | MH००२८९७४४८२०१६१७E |
| दस्ताचा प्रकार | : | भुविकास करारनामा |
| लिहुन घेणाराचे नांव | : | वासुकमल इन्फ्रा बिल्डर्स |
| लिहुन देणाराचे नाव | : | नक्षत्र बिल्डर्स |
| मुद्रांक शुल्काची रक्कम | : | रुपये ४,८२,१००/- |
| दिनांक | : | २२/०७/२०१६ |



# भुविकास करारनामा

मौजे मेहरुण शिवारातील प्लॉट जागेचे

दिनांक २२/०७/२०१६ रोजी लिहून दिले असे.

ज ल न - २
दस्त.क्र. ३४८४/२०१६
३/२६

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची मुद्रा
सत्यमेव जयते
जळगांव-२
JALGAON-2

**वासुकमल इन्फ्रा बिल्डर्स तर्फे प्रो.प्रा.**
**श्री. नरेंद्र झिपरुलाल काबरा**
उ.व.५८, धंदा- व्यापार,
रा.वासुकमल, ७१ नवीपेठ, जळगांव.
ता.जि.जळगांव.पिन-४२५००१
Pan - ACAPK4388F

} **लिहून घेणार विकासक/डेव्हलपर**

**नक्षत्र बिल्डर्स चे भागीदार**
**श्री.हरिषकुमार किमतराम आडवाणी**
उ.व. ५१, धंदा- व्यापार ,
रा.नवजीवन कॉलनी,सुदर्शन बिल्डींग जवळ,
अमरावती, ता.जि.अमरावती-४४४६०१
Pan - AAJFN8153A

} **लिहून देणार जमीन मालक**

Scanned by CamScanner

जळगन - २
दस्त क्र. ३४८४ / २०१६
४१२६



कारणे भूविकास करारनामा लिहून देतो

की,

लिहून देणार यांचे संपुर्ण मालकीची, वहिवाटीची व कब्जे उपभोगातील खालील प्रमाणे वर्णनाची स्थावर मिळकत खुली जागा आम्ही तुम्हांस भूविकास करण्यासाठी देत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव, पैंकी मौजे मेहरुण शिवारातील शहर महानगरपालिका हद्दीतील :-

**मौजे मेहरुण येथील स.नं.४२८/१/२ यातील बखळ प्लॉट नं.४५ यास विस्तारीत क्षेत्र सिटी सर्व्हे नं.५२२८ दिलेला असुन त्याचे एकुण क्षेत्र ६१८.७ चौ.मी.आहे.** सदर प्लॉट जागेत मे. कलेक्टर साहेब जळगांव यांचेकडील बिनशेती हुकुम नंबर जमिन/१/बिशे/एसआर/२६/२०१५ दिनांक १८/०५/२०१५ नूसार स्वतंत्र बिनशेती परवानगी मिळालेली आहे.

**यासी लांबी रूंदी**

| | | |
|---|---|---|
| पूर्व बाजू | - | १८.०० मीटर, |
| पश्चिम बाजू | - | ३२.४०मीटर |
| उत्तर बाजू | - | २७.७३ मीटर |
| दक्षिण बाजू | - | ३१.२५ मीटर |

**यासी चतुःसिमा :-**

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | :- | प्लॉट नं.४६, |
| **पश्चिमेस** | :- | रोड रस्ता, |
| **उत्तरेस** | :- | सिटी सर्व्हे नंबर ५२२७, |
| **दक्षिणेस** | :- | सिटी सर्व्हे नंबर ५२३१,५२२९ व ५२२१ |

येणे प्रमाणे चतुःसिमेतील मिळकत जागा, आणि तदंगभूतवस्तुंसह संपूर्ण मिळकत ही आमच्या संपूर्ण मालकीची व कब्जेउपभोगातील असून या भूविकास करारनाम्याचा व मुखत्यारपत्राचा मुख्य विषय असून या मिळकतीला यापुढे **सदरची मिळकत** असे संबोधिले आहे. तसेच **तुम्ही** या शब्दाचा अर्थ **विकासक** (डेव्हलपर्स) (लिहून घेणार)

THE SEAL OF JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव-२ सत्यमेव जयते

Scanned by CamScanner

जलगं - २
दस्त.क्र. ३४८४/२०१६
५/२६

असा गृहीत धरलेला आहे व आम्ही या शब्दाचा अर्थ जमीन मालक (लिहून देणार) असा गृहीत धरलेला आहे. आम्ही लिहून देणार यांना सदर मिळकत डेव्हलपमेंट करावयाची होती म्हणून आम्ही लिहून देणार व तुम्ही लिहून घेणार यांच्यात सदर मिळकतीबाबत बोलणी होवून खाली लिहील्याप्रमाणे करार पक्का झाला आहे.

वर उल्लेख केलेली संपुर्ण मिळकत ही आमचे मालकीची आहे. ती तुम्हांस विकसीत करण्याची इच्छा आहे. सदरची मिळकत आम्हाला विकसीत करणे शक्य नाही. तसेच मिळकत विकसीत करण्यासाठी लागणारे भांडवल सुध्दा विकासक यांचे जवळ आहे. असे असले तरी लिहून देणार यांना सदर जमिनीची विक्री करण्याची मात्र इच्छा नाही, व त्यामुळे आम्ही विकासक यांना जमिनीचा विकास करणेकामी विकासक नेमण्याचे ठरविले व विकासक हे मिळकतीचा विकास करण्याचे कामी अनुभवी आहेत व तांत्रीक ज्ञान असलेले आहेत व त्यांचेवर जमिन मालक यांचा पुर्ण विश्वास आहे म्हणून जमिन मालक यांनी विकासक यांना सदर मिळकतीचा विकास करण्यासाठी भुविकास करारनामा करून देण्याचे कबुल केले. उभयतांमध्ये जे ठरले त्यानुसार पुढील प्रमाणे भूविकास करारनामा करण्यात येत आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव सत्यमेव जयते

**भरण्याचा तपशिल :-**

रु. ११,००,०००/- अक्षरी रुपये अकरा लाख मात्र चा दि. जळगांव पिपल्स सहकारी बँक लि.जळगांव , मुख्य शाखेचा चेक नं.००८०२५ हा दि. ११/०७/२०१६ रोजीचा लिहुन घेणार यांनी लिहून देणार यांचे नावे दिला तो मिळाला ते यात मजरा.

रु. ८०,००,०००/- अक्षरी रुपये ऐंशी लाख मात्र चा दि. जळगांव पिपल्स सहकारी बँक लि.जळगांव , मुख्य शाखेचा चेक नं.००८५७२ हा दि. २३/०७/२०१६ रोजीचा लिहुन घेणार यांनी लिहून देणार यांचे नावे दिला तो मिळाला ते यात मजरा.

**रु. ९१,००,०००/- एकुण रक्कम रु.एक्कानऊ लाख मात्र मिळाले ते यात मजरा.**

**मिळकतीची पार्श्वभुमी :-**

सदरची वर वर्णन केलेली मिळकत आम्ही शकुंतलाबाई प्रेमराज कावरा यांचेकडून रजि.खरेदीखत दस्त नं. २३७१/२०१५ दि.०१/०१/२०१५ रोजी खरेदी केली आहे.

Scanned by CamScanner

जलन - २
दस्त.क्र. ३४८८/२०१६
६/२६



त्यानुसार आज रोजी वरील लिहून देणार मालक असून आपणास लिहून देणार यांनी त्यांचे मर्जीने व स्वखुशीने सदर मिळकत तुम्हांस विकसीत करण्यासाठी दिलेली आहे.

**मिळकतीचे हमी पत्र :-**

सदरची मिळकत निर्वेध, निर्जोखमी व बोजेविरहीत असून सदर मिळकतीवर आम्ही इतर कसलाही कोणाचाही हक्का, हितसंबंध, अधिकार, गहाण, दान, लिज, जिन, बक्षीस पोटगी वगैरे स्वरूपाचा बोजा निर्माण केलेला नाही किंवा सदर मिळकत ही कोणत्याही जडजोखमीत गुंतविलेली नाही. तसेच सदर मिळकतीचे उताऱ्यावर मालक सदरी आमचे नावाचा उल्लेख केलेला आहे.

**हस्तांतरणाचा अधिकारी :-**

१) **मालकी हक्क :-**

सदर मिळकतीमध्ये इतर कोणासही कोणत्याही प्रकारचे राईटस, टायटल, इंटरेस्ट अगर मालकी हक्क नाहीत. (यापुढे त्यांचा एकत्रित उल्लेख हक्क व अधिकार असा केला आहे.) त्या व्यतिरिक्त कोणाचा कोणताही हक्क वा कोणताही वाद उपस्थित झाल्यास त्याचे निरसर आम्ही लिहून देणार आमच्या स्वखर्चाने करू व त्याची कोणतीही तोषीस तुम्हास लागू देणार नाही.

२) **विनाशर्त अधिकार :-**

सदर मिळकत व त्यातील जमीन मालकांचे हक्क व अधिकार कोणत्याही मार्गाने विक्री, वर्ग, असाईन, हस्तांतरीत, तबदील, अभिहस्तांकन व नामांतरीत करण्याचा अगर ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट मध्ये नमुद केलेल्या इतर कोणत्याही स्वरूपात हस्तांतरण करण्याचा लिहून देणार यांना विनाशर्त अधिकार आहेत.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

३) **कब्जा :-**

सदर मिळकत ही आमच्या ताब्यात आहे. सबब सदर मिळकती चा प्रत्यक्ष कब्जा आम्ही तुम्हास आज रोजी दिलेला आहे. परंतु मुळ खरेदीखतचा दस्त हा लिहुन देणार यांचे कडेच राहील. तसेच सरकारी मोजणी हद्द कायम करून द्यावयाची जबाबदारी आमची आहे. कब्जाबाबत काही एक तक्रार राहिली नाही.

४) **कर :-**

सदर मिळकतीसंबंधी आजपर्यंतचे सर्व सरकारी, निमसरकारी, महानगपालिका कर, शेतसारा वगैरे सर्व कर भरण्याची जबाबदारी आमचेवर म्हणजेच लिहून देणार

Scanned by CamScanner

जलगाव-२
दस्त क्र. ३४२४ / ०१२६

यांचेवर असून त्यानंतर पुढील सर्व कर भरण्याची जबाबदारी तुमचेवर म्हणजे लिहून घेणार यांचेवर राहील.

५) **दस्तऐवजाचा खर्च :-**

लेखाने नमुद केलेले भूविकास करारनामा व जनरल मुखत्यारपत्र या दस्तऐवजांसाठी लागणारा संपुर्ण खर्च, स्टॅम्प, टायपिंग व रजिस्ट्रेशन फी व इतर अनुषंगीक खर्च तुम्ही लिहून घेणार व लिहुन देणार यांनी निम्मे-निम्मे केलेला आहे व राहील.

६) **कर्ज, चार्ज, बोजा :-**

सदरची मिळकत कोणाकडेही गहाण, दान, तारण, अगर लिज केलेली नाही. सदर मिळकतीवर कोणाचे पोटगी अगर चोळी-बांगडीचा अगर लग्नाचे खर्चाचा बोजा नाही. सदर मिळकतीबाबत मी कोणत्याही कोर्टात अगर कार्यालयात कोणत्याही प्रकारे अंडरटेकींग अगर वचन दिलेले नाही. सदर मिळकतीचा वापर करून आम्ही कोणासही जामीनकी दिलेली नाही अशी खात्री आम्ही आपणास देतो.

७) **वाद :-**

सदर मिळकतीबाबत कुठल्याही कोर्टात कसल्याही प्रकारचा वाद प्रलंबित नाही, कोणत्याही हुकूमनामा झालेला नाही. कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही कोर्टात, कोणत्याही प्रकारची दरखास्त पेडींग नाही. अगर सदर मिळकतीचे हस्तांतरण करू नये असा कोणत्याही कोर्टाचा मनाई हुकूम नाही. अगर कोणत्याही कोर्टाने अगर शासकीय हुकूमाने अव्वल अगर अंतीम जप्ती झालेली नाही. अशी खात्री आम्ही आपणास देतो.असे काहीही निघाल्यास त्याचे संपूर्ण निरसन करण्याची जबाबदारी लिहून देणार यांचीच राहील. .

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

८) **इजमेंट :-**

इजमेंटच्या ॲक्टच्या तरतुदीअन्वये सदर मिळकतीवर कोणत्याही इजमेंटचा, वहिवाटीचा, ग्रॅंटचा, अगर इतर तत्सम बोजा नाही. अशी खात्री आम्ही आपणास देतो.

९) **भागीदारी फर्मबाबत माहिती :-**

सदर लिहून देणार **नक्षत्र बिल्डर्स** ही भागीदारी फर्म असून **श्री.हरिषकुमार किमतराम आडवाणी** हे सदर फर्मचे भागीदार आहेत.त्यांनी उर्वरीत सर्व भागीदारांच्या संमतीने व मर्जीने सदरचा व्यवहार केलेला आहे असा विश्वास व खात्री त्यांनी लिहुन देणार यांना दिलेली आहे. त्यामुळे सदर भागीदारी फर्मने लिहून घेणार यांना लिहून व नोंदवून दिलेला सदर भुविकास करारनामा व त्याअनुषंगाने दिलेला मुखत्यारनामा हा इतर सर्व भागीदारांवर सुध्दा कायम व बंधनकारक आहे व राहील.तसेच सदर

Scanned by CamScanner

ज ...
दस्त.क्र. ३४२४ / ८/२६



भागीदारी फर्मचे इतर दोन भागीदार म्हणजे **श्री.चंद्रकांत किमतराम आडवाणी** व **श्री.शंकरलाल किमतराम आडवाणी** यांनी सुध्दा सदर विकसन करारनामा व त्याअनुशंगाने लिहुन दिलेले मुखत्यार पत्र हे लिहुन घेणार यांना लिहुन देणेसाठी संमती दिली असुन ते संमतीपत्र सोबत जोडलेले आहे.

**१०) महत्वाची अटी :-**

१) सदर भुविकास करारनाम्याच्या भरण्यात नमूद असलेले चेक हा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर व्यवहाराच्या सिक्युरिटीपोटी बिनव्याजी दिलेले आहे. सदर बाब ही उभयतांना मान्य व कबूल आहे. सदर लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सिक्युरिटी पोटी दिलेली संपूर्ण रक्कम ही लिहून घेणार यांनी सदर मिळकतीवर बांधकाम पुर्ण झालेनंतर बांधकाम पुर्णत्वाचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र मिळणेसाठी जळगाव शहर महानगरपालीकेत अर्ज केल्यानंतर लिहून देणार यांनी लिहुन घेणार यांना परत करावयाची आहे.

२) सदर मिळकतीवर लागणारे टी.डी.आर. क्षेत्र २७१.४८ चौ.मी. इतके क्षेत्र हे लिहून देणार यांनी रजिस्टर्ड खरेदीखत दस्त नंबर १८६१/२०१६ दि.०२/०६/२०१६ रोजी खरेदी केलेले आहे. त्यासह सदर मिळकत भुविकास करण्यास दिलेली आहे. तसेच सदर लिहुन देणार यांनी विकत घेतलेल्या टि.डी.आरचा मोबदला म्हणुन लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना तेवढेच म्हणजेच २७१.४८ चौ.मी.एवढे क्षेत्राचे टि.डी.आर द्यावयाचे आहे.

३) सदर भूविकास करारनाम्या मधील मिळकतीची लिहन देणार यांनी जळगांव शहर म.न.पा. जळगांव यांच्याकडून बांधकाम परवानगी पत्र क्र.टी.पी./बी.पी./०२८३ दिनांक ०७/०६/२०१६ रोजी घेतलेली असून ती लिहून घेणार यांनी संबंधित कार्यालयांकडून रिव्हाईज व वाढीव बांधकाम परवानगी घ्यावयाची आहे. त्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च हा लिहून घेणार यांनी करावयाचा असून त्याची कोणतीही तोषीस लिहून देणार यांना लागू देणार नाही. तसेच लिहुन देणार यांनी वर नमुद केलेल्या बांधकाम परवानगीचा जो काही खर्च केलेला असेल तो सुध्दा लिहुन घेणार हे लिहुन देणार यांना दि. जळगांव पिपल्स सहकारी बँक लि.जळगांव , मुख्य शाखेचा चेक नं.००८५७३ दि.२३/०७/२०१६ ने

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

Scanned by CamScanner

परत दिलेले आहे.

ज

दस्त.क्र. ३८४८

४२६

४) सदर मिळकतीत विकसीत झालेल्या बांधकामाच्या विक्रीतून निव्वळ रकमेच्या **५०% लिहून देणार** यांना द्यावयाची आहे व उर्वरीत **५०% विकसक** यांनी द्यावयाची आहे. परंतु, जर विक्री करतांना स्टॅम्प ड्युटी भरावी लागली, काही खर्च करावा लागला जसे व्हॅट टॅक्स, सर्व्हीस टॅक्स, मार्केटींग खर्च, जाहीरात खर्च, दलाली खर्च थोडक्यात विक्रीसाठी लागणाऱ्या एकूण खर्चात ५०% लिहून देणार यांना द्यावयाची आहे व ५०% विकसक यांनी करावयाचा आहे. हा हिशोब दर महिन्याच्या अखेरीस लिहून देणार यांना लिहून घेणार सादर करतील व लिहून घेणार हे लिहून देणार यांना त्यांचा हिस्सा देतील.

५) सदर मिळकतीवर भविष्यात मिळणाऱ्या जास्तीच्या एफ.एस.आय., टी.डी.आर व त्या क्षेत्रावर केलेल्या विक्रीच्या खर्च वजा जाता येणाऱ्या निव्वळ रकमेच्या ५०% लिहून देणार यांना द्यावयाची आहे व उर्वरीत ५०% विकसक यांनी घ्यावयाची आहे. कारण, सदर मिळणारी रक्कम रोख वा चेकद्वारे लिहून घेणार यांचे नावे मिळेल त्यांनतर त्यातील ५०% ही लिहून घेणार हे लिहून देणार यांना देतील. परंतु, सदर मिळकतीवर बांधकामासाठी भविष्यात लागणारा अधिकच्या टी.डी.आर. खरेदीचा संपूर्ण खर्च व वाढिव बांधकामाचा खर्च सुध्दा लिहून घेणार यांनी करावयाचा आहे व राहील.

६) सदर मिळकतीवर लिहून घेणार यांनी रिव्हाईज व वाढीव बांधकाम परवानगी पत्र मिळाल्यानंतर १८ महिन्यात बांधकाम पूर्ण करावयाचे आहे.

७) सदरचे डेव्हलपमेंट करारानुसार सदर प्लॉट मिळकतीवर नियोजीत बांधल्या जाणाऱ्या इमारतीबाबचा नकाशा तसेच आर.सी.सी. डिझाईन यासाठी आर्कीटेक्टची नेमणूक लिहून घेणार यांनी करावयाची आहे. तसेच सदरचा नकाशा मंजूर झाल्यानंतर त्याप्रमाणे नियोजीत इमारतीचे बांधकाम करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार आम्ही लिहून देणार यांनी तुम्ही लिहुन घेणार यांना या कराराने दिलेला आहे. तसेच तुम्हांस योग्य वाटल्यास नियमाप्रमाणे सदर नकाशामध्ये फेरबदल करुन रिव्हाईज्ड नकाशे मंजुर करुन घेणे त्याबाबतच्या

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON

Scanned by CamScanner

ज ल

दस्त क्र. ३४४८

१०/३६

परवानग्या घेणे त्या प्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्यावर कंप्लीशन नकाशे तयार करणे महानगरपालिका जळगांव यांचे कडून कमेन्समेंट/कंप्लीशन सर्टीफीकेट घेणे याचा सुध्दा हक्क व अधिकार आम्ही तुम्हास या करारनाम्यान्वये दिलेला आहे.

८) सदर प्लॉट मिळकतीवर डेव्हलपमेंट तुम्ही तुमचे संपूर्ण खर्चाने करावयाचे आहे त्यासाठी आर्कीटेक्ट नेमणे, कॉन्ट्रॅक्टर नेमणे, मजुर कारागीर नेमणे व बांधकामासाठी लागणारे संपूर्ण मटेरीयल तुम्ही तुमचे नावाने खरेदी करणे व नेमलेले सर्व आर्किटेक्ट, कॉन्ट्रॅक्टर, मजुर, ठेकेदार वगैरे यांना पेमेंट देणे.

९) सदर मिळकतीवरील बांधकाम पुर्ण करण्यासाठी व त्याअनुषंगीक कामे कृत्य व बाबी करणेसाठी तुम्ही विविध कार्यासाठी ठेकेदार नेमूण कामाचा ठेका देवून ती कामे तुम्ही लिहून घेणार यांनी स्वतः स्वखर्चाने करावयाची आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

सदर विकासकामाच्या प्रसिध्दीसाठी सदर मिळकतीवर योग्य त्या ठिकाणी जाहीरात फलक बसविण्याचा विकासकाला हक्क व अधिकारी आहे.

११) सदरची मिळकत जमीनीशी संबंधीत वाद असल्यास लिहून देणार यांनी त्याचे निरसन करावयाचे आहे. तसेच बांधकामासंबंधी कोणताही वाद उपस्थित झाला तर त्याचे निरसन विकासक यांनी करावयाचे आहे. बांधकामाबाबत वाद उपस्थित झाल्यास विकसक यांनी न्यायालयामध्ये मालक त्यांच्या वतीने हजर रहावयाचे आहे व कोर्ट कचेरीविषयक आवश्यक ती सर्व काम करावयाची आहेत व त्यासाठी लिहून देणार हे लिहून घेणार यांना सर्वतोपरी मदत करतील.

१२) सदर मिळकतीवर डेव्हलपमेंटकामी तात्पुरते शेड बांधणे, नळकनेक्शन घेणे, इले.मिटर कनेक्शन घेणे वगैरे अधिकार तुम्हांस या कराराने राहतील. मात्र सदर बाबतचे येणारे बिले तुम्ही भरावयाची आहे.

१३) सदरची मिळकत भाग विकसीत करण्याचा किंवा काही भागावर बांधकाम करण्याचा तसेच कोणतेही ब्लॉकस् , कोणतेही फ्लॅटस, कितीही क्षेत्र एक किंवा अनेक व्यक्तीस विकण्याचा अधिकार विकासक यांना आहे व राहील. त्या दृष्टीने त्रयस्थ इसमाशी बोलणे करुन सौदेपावती, खरेदीखत, गहाणखत,

Scanned by CamScanner

जलन - २
दस्त.क्र. ३४०४/२०१६
११/२६

रिकन्व्हेंन्स डीड (बोजा कमी करण्याचा लेख) इत्यादी दस्त नोंदणी अधिनियमातील संपुर्ण दस्तऐवज म. सह दुय्यम निबंधक वर्ग-२ सो. जळगावं यांच्या कार्यालयमध्ये नोंदविणेचा, हजर करण्याचा व भरणा स्विकारण्याचा व कबुली जबाब देण्याचा अधिकार तसेच बयाणा रक्कम रोख/चेक/डी.डी. व्दारे तसेच इत्यादी प्रकारे स्विकारण्याचा विकासक यांना अधिकार आहे व राहील. व त्यातील जमीन मालकांचा ५०.००% हिस्सा हे विकसक यांनी जमीन मालकाला द्यावयाचा आहे.**परंतु सदर कोणतेही दस्त लिहुन नोदंवितांना लिहुन देणार व लिहुन घेणार या दोघांची सही आवश्यक असेल.**

१४) सदर मिळकत विकसनाबाबत लिहून घेणार यांनी दि. १४/०७/२०१६ रोजीच्या दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रांमध्ये ॲड. सुनिल एस.तारे ,जळगाव यांचे मार्फत जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली होती व आहे.त्याबाबत कोणाचीही हरकत आलेली नाही. तसा दाखला सुध्दा दिलेला आहे.

१५) सदर मिळकतीबाबत सदर भूविकास करारनाम्यास अनूसरून, जनरल मुखत्यारपत्र सुध्दा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना लिहून देणार आहेत.

१६) या करारनाम्याच्या अंतर्गत उद्देशित उद्दिष्टांची पूर्ती होईपावेतो सदर करारनामा अस्तित्वात राहील व रद्द होणार नाही.

येणेप्रमाणे भु-विकास करारनामा आम्ही आमच्या स्वराजीखुशीने व स्वसंतोषाने खालील साक्षीदारांसमक्ष लिहून दिला असून तो आमचेवर व आमचे वंशवारस, भाऊबंद तसेच इस्टेटवारस यांचेवर पुर्णपणे बंधनकारक आहे व राहील.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2



..........................................

**वासुकमल इन्फ्रा बिल्डर्स तर्फे प्रो.प्रा.**

**श्री. नरेंद्र झिपरूलाल काबरा**

**लिहून घेणार**

Scanned by CamScanner

जलन - २

दस्त क्र. 3808/२०१६

९४२६



Harishkumar

नक्षत्र बिल्डर्स चे भागीदार

श्री.हरिषकुमार किमतराम आडवाणी

लिहून देणार

-: साक्षीदार :-

Rushi Kabra
Mani peth, Jalgaon सही ........ Kabra

Ashok Kapee
Mongale plot, Jalgaon सही ........ Ashok

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II JALGAON-2

Scanned by CamScanner